# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**घाटकोपर (प) मुंबई येथील ओम चैतन्य गगनगिरी महाराज गृहनिर्माण संस्थेतील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत**

**(१) ३५७३५ (२१-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटकोपर (प) मुंबई येथील ओम चैतन्य गगनगिरी महाराज गृहनिर्माण संस्थेतील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत शासन स्तरावर सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उक्त चौकशीत दोषी आढळून आलेल्या दोषी अधिकारी/विकासक यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२५-०९-२०१८) :** (१) व (२) ओम चैतन्य गगनगिरी महाराज गृहनिर्माण संस्थेतील ८५ झोपडीधारकांनी सादर केलेल्या बोगस पुराव्याच्या प्रकरणी चौकशी पुर्ण करण्यात आली आहे. सदर ८५ झोपडीधारकांना चौकशीअंती अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यापैकी अविश्वसनिय विजदेयके सादर करणाऱ्या झोपडीधारकांविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), घाटकोपर यांनी दि.४.७.२०१३ अन्वये वरीष्ठ पोलीस निरिक्षक, घाटकोपर यांना कळविण्यात आले. घाटकोपर पोलीस ठाणे येथे पहिली खबर क्र.२२८/२०१६, दि.२८.४.२०१६ रोजी भा.द.वि. कलम ४६५, ४६७, ४६८, ४७०, ४७१, ४२० अन्वये एकुण ५९ झोपडीधारकांवर गुन्हा दाखल झाला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
सदर प्रकरणी महसूल व वन विभाग, शासन आदेश, दि.६.९.२०११ अन्वये तत्कालीन उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), घाटकोपर यांना निलंबित करण्यात आले होते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**'गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमा' अंतर्गत दिला गेलेला निधी महानगरपालिकेकडून परस्पर वेगळ्याच कामांसाठी वापरला जात असल्याबाबत**

**(२) ७४३८९ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेकडून 'गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमा'अंतर्गत शसनाकडून दिला गेलेला निधी परस्पर वेगळ्याच कामांसाठी वापरला जात असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची दाखल घेऊन या सर्व प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्यात येणार असल्याचे मा.राज्यमंत्री समाजकल्याण यांनी माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून या योजनेअंतर्गत महानगरपालिकेस झोपडपट्ट्यांमध्ये विविध विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो, परंतु तो निधी झोपडपट्ट्यांमध्ये न वापरता त्याच्या नावाखाली अन्य विकासकामांसाठी वापरला जातो व तो निधी वापरताना आमदारांना महानगरपालिकेकडून विश्वासात घेतले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१), (२) (३) हे खरे नाही.

सन जानेवारी २०१६ च्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत शासनाकडून दिला गेलेला निधी महापालिकेकडून परस्पर वेगळयाच कामासाठी वापरला जातो का याबाबत विचारणा झाली होती.

सदर प्रकरणाची विशेष पथकामार्फत चौकशी करण्यात येणार असल्याबाबतची माहिती मा. राज्यमंत्री यांनी सर्किट हाऊस मधील मिटिंगमध्ये दिली होती.

नागरी दलित वस्ती अंतर्गतच्या प्रशासकीय मान्याता मिळालेल्या कामावरच सदरचा निधी आमदारांना विश्वासात घेऊन खर्च करण्यात आलेला आहे.महानगरपलिकेकडून परस्पर निधी वळविला गेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहाडी नगरपंचायत (जि.भंडारा) डीपीआर बनविण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(३) १०३५६० (०३-०१-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी नगरपंचायत (जि.भंडारा) डीपीआर बनविण्यास विलंब होत असल्याबाबत स्थनिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २६ जून, २०१७ ला निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) होय. नगरपंचायतीसाठी आवश्यक डीपीआर केले नसल्याबाबत सदर तक्रार होती.

(२) • मोहाडी नगरपंचायतीकरीता पंतप्रधान आवास योजनेचा डीपीआर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

• नगरपंचायतीकरीता पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, गोंदिया यांच्यामार्फत तयार करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

• शहराचा विकास आराखडा व अन्य योजनांचे डीपीआर तयार करुन सक्षम प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करुन घेण्याबाबत मुख्याधिकारी, नगरपंचायत मोहाडी यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील खाजगी भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना तात्काळ सादर न केल्यास भूखंड ताब्यात घेण्याच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत

**(४) १०४९३३ (०३-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात खाजगी भूखंडावर मोठ्या प्रमाणात झोपड्या असून या भूखंडधारकांनी तात्काळ झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर न केल्यास भूखंड ताब्यात घेण्याच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दोन वर्षापूर्वी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी निर्णयाची घोषणा केली असून पुणे शहरात किती भूखंडधारकांकडून भूखंड ताब्यात घेण्यात आले आहेत,

(३) असल्यास, सदर भूखंड ताब्यात घेण्यास विलंब करणा-या संबधित अधिकाऱ्यांवर व भूखंडधारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या अहवालानुसार, पुणे शहरातील खाजगी व सरकारी जागेवरील झोपडपट्ट्यांबाबत नगर विकास विभाग विशेष नियमावली दि.११.०९.२०१४ च्या तरतुदीप्रमाणे खाजगी जागेवरील जमीन मालकांना ३ वर्षाच्या आत पुनर्वसन प्रस्ताव दाखल

करण्यासाठी पहिले प्राध्यान्य दिले जाते. सदर कालावधी सप्टेंबर, २०१७ मध्ये संपुष्टात आल्याने प्राधिकरणाने दि.१८.११.२०१७ रोजी जमीन मालकांना ९० दिवसांची नोटीस जारी करुन प्रत्यक्ष जागेवर जाहिर प्रकटने डकविण्यात आली आहेत. जमीन मालकांनी ९० दिवसांत पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल न केल्यास त्यांना असलेला प्राधान्याचा हक्क राहणार नसल्याने प्राधिकरणाकडे ज्या विकासकाकडून संपादनाचा प्रस्ताव दाखल झाला आहे, त्या प्रकरणी प्राधिकरणामार्फत जमीन संपादन करण्याची प्रकिया सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रक्रिया चालू असल्याने प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे पीएमपीएमएलकडून आयुर्मान संपलेली वाहने मार्गावर वापरण्यात येत असल्याने वाहनांच्या अपघातामध्ये सरासरीपेक्षा दुप्पट वाढ झाल्याबाबत**

**(५) १०५१०३ (१८-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे पीएमपीएमएलकडून आयुर्मान संपलेली वाहने मार्गावर सोडली असल्याने वाहनांच्या अपघातामध्ये सरासरीपेक्षा दुप्पट वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुर्मान संपलेल्या गाड्या मार्गावर येत असल्याने प्रवाश्यांचा जीव धोक्यात येत असून याचा पीएमपीएमएल कामगार संघटनेही तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे परिवहन कार्यालयाकडून जाहीर केलेल्या यादीमध्ये पुणे शहरात पीएमपीएमएल पंधरा वर्षापेक्षा अधिक आयुर्मानाची पाचशे वाहने असून त्यामध्ये सीएनजीच्या दीडशे वाहनांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ही बाब दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या दृष्टीने घातक असून या संदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • पीएमपीएमएलकडे एकूण १२९२ बसेस असून यापैकी १२ वर्षांच्या आतील १०३८ इतकी, १२ ते १४ वर्षे आयुर्मानची २०७ इतकी वाहने व १५ वर्षे व त्यापुढील आयुर्मान असलेली एकूण ४७ इतकी वाहने आहेत. १२ वर्षा पुढील कोणत्याही बसचा माहे जानेवारी २०१८ मध्ये अपघात झालेला नाही.

• पंधरा वर्षापेक्षा अधिक आयुर्मानाची ४७ इतकी वाहने आहेत. त्यातील ३६ बसेस भंगारात काढण्यात आल्या असून १५ वर्षापुढील एकही सीएनजी बस मार्गावर वापरण्यात येत नाही.

• उपलब्ध बसेसची संख्या विचारात घेता त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने ४०० सीएनजी व १०० डिझेल बसेस ताफ्यात दाखल करण्याची प्रक्रीया राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील उड्डाणपुलांची कामे संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(६) १०५१९१ (१४-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील उड्डाणपुलांची कामे संथ गतीने सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे, खडकवासला अंतर्गत चांदणी चौक उड्डाणपुलाचे काम मंजूर असतांना भूसंपादनाअभावी प्रकल्प प्रलंबित असल्याचेही माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलासाठी आवश्यक महानगरपालिका हद्दीत्तील ९५ टक्के क्षेत्र भूसंपादन प्रक्रिया जलद गतीने होण्यासाठी दिनांक ०४ मार्च, २०१७ रोजी जा.क्र.१४९६ ने मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना लेखी पत्रव्यवहार केला असतांना आजतागायत कुठलीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चांदणी चौक, कोथरुड, वारजे, डेक्कन चौक, संचेती इस्पितळाजवळील पूल, स्वारगेट चौक, पौड मार्ग, कर्वे मार्ग, सिंहगड, एनआयबीएम मार्ग या ठिकाणी सुरु असलेल्या उड्डाणपुलांचे जवळपास साठ टक्के काम अपूर्ण असून कंत्राटदारांना वारंवार मुदतवाढ दिली जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व उड्डाणपुलांचे काम तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने आणि होत असलेल्या विलंबामुळे पुलाच्या खर्चामध्ये दिवसागणिक होणारी वाढ लक्षात घेता शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

पुणे शहरातील कमिन्स कॉलेज व्यतिरिक्त सर्व उड्डाणपुलांची कामे माहे जानेवारी २०१८ मध्ये योग्य गतीने चालू होती.

कमिन्स कॉलेज चौकातील उड्डाणपुलाचे काम दिनांक १७/०२/२०१८ रोजी पूर्ण होवून वाहतुकीस खुला करणेत आला आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

भूसंपादनाची कार्यवाही पुणे महानगरपालिकेने सुरु केली आहे.

(४) अभियांत्रिकी महाविद्यालय चौक, स्वारगेट चौक या ठिकाणची उड्डाणपूलांची कामे जानेवारी २०१८ पूर्वी पूर्ण झाली असून सदरचे उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले करणेत आले आहेत. तसेच वारजे कमिन्स कॉलेज चौक येथील उड्डाणपूलाचे काम दिनांक १७/०२/२०१८ रोजी पूर्ण होवून हा पूल वाहतुकीस खुला करणेत आला. लुल्लानगर उड्डाणपूलाचे काम सुरू असून सप्टेंबर २०१८ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(५) उड्डाणपूलांच्या कामामध्ये असणाऱ्या अडचणी (उदा. अतिक्रमणे, विद्युत पोल, झाडे काढणे इ.) तातडीने दुर करून उड्डाणपूलांची कामे वेळेवर पूर्ण करणेसाठी प्रयत्न करणेत येत आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील धारावी येथे म्हाडाने बांधलेल्या बायोटॉयलेटच्या दुरवस्थेबाबत**

**(७) १०५२५७ (०३-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावी क्रॉस रोडवरील श्री गणेश विद्या मंदिर प्राथमिक शाळेत बसविण्यात आलेले लाखो रुपयांच्या बायोटॉयलेटची अवघ्या तीन वर्षात दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बायोटॉयलेट म्हाडा प्रशासनाने माझी मुंबई निर्मल मुंबई अभियानाअंतर्गत बांधले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडाने लाखो रुपये खर्च करुन शाळेला बायोटॉयलेट उपलब्ध करून दिले परंतु त्याला लागणाऱ्या इतर सुविधा उपलब्ध करून न दिल्यामुळे त्यांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बायोटॉयलेटच्या देखभालीसाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०९-२०१८) :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्या अहवालानुसार सदर बायोटॉयलेटची दुरावस्था ही प्रामुख्याने सभोवतालच्या झोपडपट्टीवासीयांकडून बायोटॉयलेटचा होत असलेला अतिवापर, मोडतोड तसेच योग्य त्या देखभाल व दुरुस्ती अभावी झाली आहे.
(२) सदर बायोटॉयलेट दलित वस्त्यांमधील शाळांना पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधा पुरविण्याकरिता सन २०१२-१३ च्या निधी अंतर्गत बांधले आहे.
(३) व (४) सदर जागी रु.५.७५ लक्ष निधी खर्च करुन आवश्यक सर्व सुविधांसह ४ आसनी बायोटॉयलेट बांधण्यात आले. सदर बायोटॉयलेटचा ताबा श्री गणेश विद्या मंदिर प्राथमिक शाळा, संत काकय्या विकास संस्थेस पुढील देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आला आहे. बायोटॉयलेटची देखभाल व इतर दुरुस्तीची संपुर्ण जबाबदारी सदर संस्थेची आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींमध्ये सुमारे २१०० पेक्षा जास्त गाळेधारकांकडून रेडीरेकनरप्रमाणे भाडेवाढ करुन मुदतवाढ करण्याच्या निर्णयाबाबत**

**(८) १०५७०२ (१८-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीमध्ये सुमारे २१०० पेक्षा जास्त गाळेधारकांकडून रेडीरेकनरप्रमाणे भाडेवाढ करण्याचा निर्णय कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाळेधारकांना कोणतीही पूर्वसूचना न देता पूर्वीपेक्षा सुमारे पाचपट जास्त भाडेवाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत गाळेधारकांनी मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाचे रु. १२ कोटींचे उत्पन्न बुडले आहे, हे ही  खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर भाडेवाढ रद्द किंवा कमी करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८) :** (१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केट मधील ज्या गाळेधारकांची मुदत संपलेली आहे व ज्यांनी मुदतवाढ घेतलेली नाही. अशा गाळेधारकांना डिसेंबर, २०१६ मध्ये चालु रेडी रेकनरवर भाडे भरुन मुदतवाढ घेण्याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेने मुदतवाढ संपलेल्या गाळेधारकांना चालु रेडी रेकनरदराने भाडे भरण्याचे कळविल्याने अंदाजे २५० गाळेधारकांनी या प्रकरणी न्यायालयात याचिका दाखल केली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(४) गाळेधारकांनी चालू रेडीरेकनर दराने भाडे भरुन मुदवाढ घेतली नसल्याने सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या दोन आर्थिक वर्षात कोल्हापूर महानगरपालिकेचे सुमारे १७ कोटीचे नुकसान झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(५) व (६) सदर भाडेवाढ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील तरतुदीन्वये करण्यात आली असल्याने सदर भाडेवाढ कमी करणे किंवा रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे शहरातील सोसायट्यां अथवा इमारतींनी अग्निशमनचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले असल्याची माहिती नसल्याबाबत**

**(९) १०५८८५ (११-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे शहरातील सोसायट्यां अथवा इमारतींनी अग्निशमनचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले याची माहितीच नसल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून शहरातील किती सोसायट्यांनी अथवा इमारतींनी अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र घेतले याची माहितीच नसल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत शहरातील एकाही इमारतीला अग्निशमन विभागाने नोटीस पाठविलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण अधिनियम, २००६ अन्वये प्रत्येक इमारतींना अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इमारतींचा आराखडा तयार झाल्यानंतर संबंधित आर्किटेक्चर अग्निशमन यंत्रणेकडून तशी प्राथमिक परवानगी घेतो व काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित यंत्रणचे अंतिम ना-हरकत प्रमाणपत्रच घेत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

ज्या इमारतीच्या बांधकाम परवानगीसाठी अग्निशान दलाच्या ना हरकत दाखल्याची मागणी केल्यानुसार खात्याकडून प्रथम प्राथमिक ना हरकत प्रमाणपत्र व इमारतीमध्ये अग्निसुरक्षा विषयक उपाय योजनांची पूर्तता केल्यानंतर अंतिम ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. खात्याकडून देण्यात आलेल्या सर्व प्राथमिक वा अंतिम ना हरकत प्रमाणपत्रांच्या प्रती पुणे महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाकडे उपलब्ध आहेत.
(२) पुणे महानगरपालिकेने शहरातील इमारतींना दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रांच्या प्रती व त्याची माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध असून, शहरामध्ये ज्या इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नाहीत किंवा असणारी यंत्रणा/ यंत्रणेचा भाग बंद आहे असे निदर्शनास आले अशा इमारतींना अग्निशमन दलाचे वतीने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ६ अन्वये नोटीसा बजावल्या आहेत.
(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षणउपाययोजना अधिनियम २००६ नुसार कोणत्याही इमारतीमध्ये त्या इमारतीच्या भोगवट्यानुसार सदर अधिनियमात नमूद केलेली आवश्यक असणारी किमान अग्निशमन यंत्रणा बसविणे, ती कायम कार्यान्वित व सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. तसेच अशी यंत्रणा केल्याचे विहित नमुन्यातील "अ" प्रमाणपत्र त्याचप्रमाणे केलेली यंत्रणा कायम सुस्थितीत, कार्यान्वित असल्याचे "ब" प्रमाणपत्र लायसन्स प्राप्त अभिकरनाकडून प्राप्त करुन घेऊन ते प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै या महिन्यांमध्ये अग्निशमन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे.
(४) इमारत उभारणी करणेसाठी आवश्यक असणारे अग्निशमन विभागाचे प्राथमिक ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविल्याबाबत

अग्निशमन विभागाकडून अंतिम ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच बांधकाम विभागाकडून भोगवटापत्र देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने बांधकाम परवान्यासाठीच्या नियमावलीची अमंलबजावणी केली नसल्याबाबत

**(१०) १०५९६९ (१८-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने बांधकाम परवान्यासाठी राज्यातील “ड” वर्ग महानगरपालिकांसाठी नियमावली तयार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे एक वर्षाचा कालावधी उलटूनही कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने या नियमावलीची अमंलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेने शहरातील अंदाजे चार लाख चौ. फुट क्षेत्राच्या बांधकामांना निर्णय (परवानगी) दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेचे रु. ३० कोटींचे उत्पन्न बुडाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन नियमावलीची अमंलबजावणी न करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८) :** (१) होय.

दि.२०/०९/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये शासनाने बांधकाम परवान्यासाठी “ड” वर्ग महानगरपालिकांकरीता विकास नियंत्रण नियमावली लागू करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

कोल्हापूर महानगरपालिकांमार्फत “ड” वर्ग विकास नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी सुरु केलेली आहे.

(३) “ड” वर्ग विकास नियंत्रण नियमावलीचे मर्यादित असलेल्या प्रस्तावित बांधकामांना व विकास कामांना कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत परवानग्या देण्यात आले आहेत, असे कोल्हापूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद आहे.

(४) कोल्हापूर शहरात “ड” वर्ग विकास नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी करण्यात आली असून त्यांतर्गत प्रिमीयम आकारणीच्या दरात व टि.डी.आर. वापरात बदल झाल्यामूळे विकास परवाना देणेकामीचे उत्पन्न सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत सन २०१७-१८ यामध्ये घटले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(५) कोल्हापूर महानगरपालिकांमार्फत "ड" वर्ग विकास नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी सुरु केलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(११) १०६६३३ (१९-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार शासकीय जमिनी नगरपरिषदेच्या ताब्यात न घेता अतिक्रमण धारकांना अभय देणाऱ्या नगरपरिषदेच्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८) :** (१) व (२) कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील जमिनीवर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये कोणतेही अतिक्रमण झालेले नाही, असे नगरपरिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.
• तथापि, याआधी नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्याकरीता तहसिलदार, अंबरनाथ यांना महसुल व वन विभागाच्या दि.१०/१०/२०१३ रोजीच्या शासन निर्णयात विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार नगरपरिषदेमार्फत सहकार्य करण्यात आले आहे.
• कुळगाव बदलापूर शहराच्या मंजूर विकास आराखड्यानुसार शासकीय जमिनीवर असलेल्या आरक्षणातील जागा नगरपरिषदेच्या ताब्यात देण्याकरीता कुळगांव बदलापूर नगरपरिषदेमार्फत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील अंध व अपंग कोट्यातून व्यवसायाकरिता स्टॉल व जागेची केलेली मागणी**

**(१२) १०६६३७ (१२-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील अंध व्यक्ती श्री.धनंजय नारखेडे यांनी सन २००३ पासून अंध व अपंग कोट्यातून व्यवसायाकरिता स्टॉल व जागेची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार तत्कालीन मुख्यमंत्री महोदय यांचा आदेश असूनही श्री.नारखेडे यांना कायमस्वरूपी व्यवसायाकरिता मागणी केलेली जागा न देणाऱ्या नगरपरिषदेच्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८) :** (१) सन १९९१ मध्ये दिलेली परवानगी व वेळोवेळी मिळालेली मुदतवाढ अन्वये दुरध्वनी सेवा केंद्र चालविण्याकरीता जागेवर रस्त्याचे रुंदीकरण व स्कायवॉक बांधकाम प्रस्तावित असल्याने श्री. नारखेडे यांनी उपरोक्त जागेऐवजी अंध व अपंग कोट्यातून व्यवसायाकरीता स्टॉलची मागणी केली, ही वस्तुस्थिती आहे.

अर्जदार श्री.नारखेडे यांना कुळगांव बदलापूर स्टेशन जवळील जागेवर टेलीफोन बुथकरीता सन २००९ मध्ये परवानगी दिली असून सदर परवानगीस वेळोवेळी विहीत नियमानुसार मुदतवाढ देण्यात आली आहे.
(२) सन २००३ मध्ये रस्त्यांचे रुंदीकरण व स्कायवॉक प्रस्तावित असल्याने श्री. नारखेडे यांची टेलीफोन बुथ जागेवरील बांधकाम निष्कासित करण्याबाबत नगरपरिषदेने सुचना केली होती. श्री.नारखेडे यांच्या विनंती अर्जावर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी श्री.नारखेडे यांना मदत करण्याविषयी सुचना देण्यात आल्या होत्या.

दरम्यान श्री. नारखेडे यांना सन २००९ मध्ये टेलीफोन बुथ चालविण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागेच्या परवानगीस नुतनीकरण देण्यात आलेले आहे. या जागेवर नगरपरिषदेच्या मंजुर विकास योजनेनुसार नगरपरिषदेची प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून इतर कोणत्याही व्यवसायीक वापराकरीता ही जागा अनुज्ञेय करता येणार नसल्याचे कुळगाव बदलापूर नगरपरिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) येथे विजय व इमेज या जाहिरात कंपन्यांनी जाहिरात फलकासाठी नगरपालिका क्षेत्रातील जागेवर अनधिकृतपणे व बेकायदेशीर अतिक्रमण केल्याबाबत**

**(१३) १०६८८५ (१२-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका क्षेत्रातील विजय व इमेज या जाहिरात कंपन्यांनी शहरात अनधिकृतपणे व बेकायदेशीर जाहिरात फलकासाठी जागा हडप करून नगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचा भंग केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार अनधिकृतपणे जागा हडप करून त्या ठिकाणी बॅनर, होर्डिंग लावण्यासाठी फ्रेम तयार करणाऱ्या विजय व इमेज जाहिरात कंपन्यांवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८) :** (१) विजय व इमेज या जाहिरात कंपनींनी नगरपालिका क्षेत्रातील जागेवर अनाधिकृतपणे व बेकायदेशीरपणे जाहिरात फलकासाठी जागा हडप केल्याचे निदर्शनास आलेले नाही, असे कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या अहवालात नमूद केले आहे.

(२) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या अहवालानुसार शहरात सुनिश्चित ठिकाणी/स्ट्रिट पोलवर जाहिरातीकरीता ई-निविदा प्रक्रियेद्वारे पात्र ठरलेल्या इमेज मार्केटींग कंपनीस विशेष सभेच्या मंजुरीन्वये सन २०१७ ते सन २०२० या कालावधीकरीता करारनामा करुन कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

• तसेच नगरपरिषद क्षेत्रातील पूर्व-पश्चिम स्काय वॉक मधील जाहिरात कामाकरीता ई-निविदेद्वारे पात्र मे. विजय ॲडर्व्हटायझींग या कंपनीस सर्व साधारण सभेच्या मंजुरीनंतर सन २०१८ ते २०२१ या कालावधीचा तीन वर्षाचा ठेका देण्यात आला आहे. खाजगी जागेवर जाहिरातीकरीता नियमानुसार शुल्क आकारुन खाजगी जागेच्या मालकांच्या संमतीनंतर जाहिरात उभारण्याची परवानगी संबंधीत कंत्राटदारास देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरासह जिल्ह्यामधील हेरीटेज वास्तूंकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(१४) १०७१९१ (१८-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरासह जिल्ह्यामध्ये ७४ वास्तूंचा हेरीटेजमध्ये समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हेरीटेज वास्तू शासकीय कार्यालये, खाजगी संस्था यांच्या ताब्यात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वास्तूचे जतन करण्यासाठी समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा प्रशासनाकडून या हेरीटेज वास्तूंकडे दुर्लक्ष होत असल्याने या वास्तूंचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन याबाबत नियमावली करून हेरीटेज वास्तूंचे जतन करण्याबाबत जिल्हा प्रशासनाला आदेश देणार आहे काय असल्यास, किती कालावधीत देणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८)** : (१) होय, कोल्हापूर शहरातील ७४ वास्तूंचा हेरीटेज स्थळांमध्ये सन २०१२ मध्ये समावेश करण्यात आला आहे.

(२) सन २०१२ मध्ये कोल्हापूर शहरात घोषित करण्यात आलेल्या ७४ हेरीटेज स्थळांपैकी २१ शासकीय इमारती, १० सार्वजनिक / निमसार्वजनिक इमारती, २३ सार्वजनिक ट्रस्टच्या इमारती व २० खाजगी वापराच्या इमारतींचा समावेश आहे.

(३) कोल्हापूर शहरातील हेरीटेज वास्तूंचे जतन करण्याकरीता एप्रिल, २०१५ मध्ये हेरीटेज कमिटीची स्थापना करण्यात आली.

(४) व (५) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रामधील ७४ हेरीटेज स्थळांकरीता सन २०१५ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या हेरीटेज कमिटीच्या मार्गदर्शनानुसार या वास्तूंचे दुरुस्ती व जतन संदर्भात निर्णय घेतले जातात.

हेरीटेज वास्तूचे जनत करण्याबाबत सन २०१२ मध्ये नियमावली तयार करण्यात आली असून सन २०१६ मध्ये लागू करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हेरीटेज कॉन्झर्व्हेशन बाबत तरतुद करण्यात आली असून या नियमावलीच्या आधारे हेरीटेज वास्तूचे जतन करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ई-लर्निंग प्रकल्पासाठी काढण्यात आलेल्या निविदेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१५) १०८५३३ (१७-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ई-लर्निंग प्रकल्पासाठी काढण्यात आलेल्या निविदेत गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत शासनाने पुणे महानगरपालिकेस कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने या प्रकरणी दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८)** : (१), (२) व (३) • पुणे महानगरपालिकेच्या शाळांतील ई-लर्निंग प्रणाली, व्हर्च्युअल क्लासरुम, डिजीटल क्लासरुम व अडॅप्टीव्ह लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम योजना राबविण्यासाठी बाबतच्या प्रकरणी चौकशी करण्याबाबत दि. २१/७/२०१७ च्या शासन पत्रान्वय कळविण्यात आले होते.

• पुणे महानगरपालिकेचा अहवाल प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने दि. २३/८/२०१८ च्या शासन पत्रान्वये निविदा प्रक्रीया अथवा खरेदी प्रक्रीया पारदर्शक व स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीकोनातून पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी दक्षता घ्यावी, तसेच समितीने आढळलेल्या त्रुटींची काटेकोर पूर्तता करावी अशा सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माणगाव (जि.रायगड) शहरातील प्रमुख रस्त्यांपैकी कचेरी रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खडडे**

**(१६) १०९९५७ (१८-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव (जि.रायगड) शहरातील प्रमुख रस्त्यांपैकी कचेरी रस्त्यावर ठिकठिकाणी खडडे पडल्याने वाहनचालकांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे नुकतेच माहे जानेवरी,२०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता ८० लाखांचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे, काय,
(३) असल्यास, माणगाव नगरपंचायतीने या रस्त्याची २६ जानेवारीपर्यंत दुरस्ती करावी अन्यथा बेमुदत उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(५) तदनुसार उपरोक्त रस्त्यांची दुरुस्ती तात्काळ करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८) :** (१) व (२) माणगाव शहरातील कचेरी रस्त्याची सुलभ वाहतुक व रहदारीच्या दृष्टीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने त्याकरीता रु. ७९.४४ लक्ष इतका निधी नगरपंचायतीने मंजूर केला आहे, हे खरे आहे.
(३) होय, अशा आशयाचे निवेदन नगरपंचायतीस प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(४) जिल्हाधिकारी, रायगड यांनी सुलभ वाहतुकीच्या दृष्टीने सदर रस्त्याची दुरुस्ती व बांधणी करणे आवश्यक आहे, असे त्यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहेत.
(५) कचेरी रस्त्याची दुरुस्ती व रुंदीकरणाकरीता माणगाव नगरपरिषदेमार्फत सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर रु.७९.४४ लक्ष इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वर्ग केला होता. सदर रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांच्याकडून माहे एप्रिल, २०१८ मध्ये पुर्ण झालेले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली (जि.सांगली) महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांना गत २० वर्षांपासून सेवानिवृत्ती वेतन वेळेत मिळत नसल्याबाबत**

**(१७) ११०२७३ (१९-०४-२०१८). श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली (जि.सांगली) महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांना गत २० वर्षांपासून सेवानिवृत्ती वेतन वेळेत मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्ती वेतन वेळेत मिळावे या मागणीसाठी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास प्राथमिक शिक्षकांनी महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या कार्यालयासमोर लाक्षणिक आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सांगली महानगरपालिका सेवेत असणाऱ्या शिक्षकांना वेळेत सेवानिवृत्ती वेतन मिळावे म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सांगली मिरज कूपवाड शहर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांना सेवा निवृत्ती वेतन हे ५०% महानगरपालिका व ५०% राज्य शासनाकडून प्राप्त अनुदानातुन अदा करण्यात येते.

• तथापि, सदरचे प्राप्त होणारे अनुदान एकाच वेळी प्राप्त होत नाही. त्यामुळे, सन २०१३-१४ पर्यंत शासनाकडून व महानगरपालिकेकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर १००% प्रमाणे सेवा निवृत्ती वेतन सेवा निवृत्त शिक्षकांना अदा करण्यात येत होते.

• परंतु, सेवा निवृत्त शिक्षकांच्या संघटनेशी झालेली चर्चा व त्यांच्या प्रस्तावानुसार सन २०१४-१५ या आर्थीक वर्षापासून महानगरपालिकेचा हिस्सा ५०% व शासनाचा हिस्सा प्राप्त झाल्यानंतर ५०% अशा २ टप्प्यात सेवा निवृत्ती वेतन अदा करण्यात येत आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सांगली मिरज कूपवाड शहर महानगरपालिकेच्या शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवा निवृत्ती वेतन अदा करण्यासाठी मिळणाऱ्या अनुदानाची एकत्रित रक्कम वेळेवर प्राप्त होण्यासाठी महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या ११ गावांमधून मिळणारा पैसा शहरात खर्च न करता या गावांमध्येच करण्याबाबत**

**(१८) ११०४७७ (१८-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या ११ गावांमधून मिळणारा पैसा शहरात खर्च न करता या गावांमध्येच करावा अशी मागणी हवेली तालुका कृती समितीने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, ११ गावांचा यापूर्वीचा ५० कोटी रुपयांचा निधीही गावांमध्येच विकासकामांसाठी वापरावा असेही समितीने सूचविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या मागणीची दखल घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१), (२) व (३) • दि.४/१०/२०१७ च्या अधिसूचनेन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये ११ ग्रामपंचायतींच्या क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.
• पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या एकूण ११ ग्रामपंचायतींचा जमा व खर्चाचा प्राथमिक अंदाज (दायित्वे विचारात न घेता) पाहाता एकूण अंदाजे रक्कम रुपये १०.६७ कोटी सदर ग्रामपंचायतींच्या बँकांच्या खात्यांमधून पुणे महानगरपालिकेस प्राप्त होणे अपेक्षीत आहे.
• तथापि प्रत्येक्षात मात्र आजतागायत फक्त सुमारे रक्कम रुपये ४.४० कोटी इतकीच रक्कम प्राप्त झालेली आहे.
• वरील प्रमाणे वस्तुस्थिती असली तरी अशा जमा होणाऱ्या रक्कमांची वाट न पाहाता पुणे मनपाकडून आवश्यकती अर्थशिर्षके तयार करण्यात आली आहेत.
• सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात सदर ११ गावांकडून अत्यल्प निधी प्राप्त झालेला असूनही विकास कामांसाठी सुमारे एकूण रक्कम रुपये ९७.९० कोटीच्या तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम (जि.वाशिम) येथे स्थानिक बसस्थानकपासून अकोल्याकडे जाणा-या बस थांब्याजवळील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१९) ११०७४६ (१२-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम (जि.वाशिम) येथे स्थानिक बसस्थानकापासून अकोलाकडे जाणा-या बस थांब्याजवळील चौफुलीवर अनेक दिवसांपासून मोठया प्रमाणात जीव घेणे खड्डे पडले असल्याने या खड्डयांमुळे येथे वाहने उलटून अपघातांची शक्यता निर्माण झाली असलयाचे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदरील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१८) :** (१) व (२) वाशिम नगरपरिषदेच्या स्थानिक बस स्थानकापासून अकोल्याकडे जाणाऱ्या महामार्गाजवळ जानेवारी, २०१८ च्या दरम्यान रस्त्याला खड्डे पडले होते, ही बाब खरी आहे. तथापि, नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियांनांतर्गत सदर रस्त्याचे काम दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८ रोजी पूर्ण केले असून सदर रस्ता वाहतूकीस योग्य व सुरळीत झालेला आहे, तसेच अन्य जोड रस्त्यावरील पडलेले खड्डे बुजविण्यात आले आहेत, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कणकवली (जि.सिंधुदुर्ग) नंगरपंचायतीने मत्स्यबाजारपेठेतील मटन, चिकन विक्रेत्यांना गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) ११०७६९ (१२-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) शहरातील मच्छिमारांसाठी मत्स्यव्यवसाय विभागाने कणकवली नगरपंचायतीस बाजारामध्ये चिकन, मटन विवक्रेत्यांना गाळे देण्यात यावेत यासाठी व पाण्याच्या व्यवस्थेसाठी निधी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी देण्यात आलेला असतांनाही मच्छिमार्केटमधील मटन, चिकन विक्रेत्यांना गाळे उपलब्ध करुन दिलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मत्स्यव्यवसाय विभागाला सदर निधी परत गेल्यामुळे मच्छिमार्केटमध्ये मटन, चिकन विक्रेत्यांसाठी नगरपंचायतीने स्वतःच्या निधीतून गाळे उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी स्थानिक विक्रेत्यांनी पंचायत समिती प्रशासनाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यापूर्वी अनेक वेळा निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८) :** (१) कणकवली नगरपंचायतीस आधुनिक मत्स्य बाजारपेठ उभारण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यकी विकास महामंडळ यांच्या मंजुरी अन्वये रू.९९.८६ लक्ष इतक्या रक्कमेचे अनुदान प्राप्त झाले आहे. सदरचे अनुदानाचा विनियोग फक्त मत्स्यकी व्यवसायाकरीता करणे बंधनकारक आहे.

(२) सदरच्या अनुदानाचा विनियोग फक्त मत्स्यकी व्यवसायाकरीता करणे बंधनकारक असल्याने हा निधी मच्छिमार्केटमधील मटन, चिकन विक्रेत्यांना गाळ्यांकरीता उपलब्ध करुन दिलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) राष्ट्रीय मत्स्यकी विकास महामंडळ यांच्या मंजुरी अन्वये प्राप्त रू.९९.८६ लक्ष इतक्या अनुदानाचा विनियोग करून मच्छी मार्केट इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

तथापि मच्छिमार्केटमध्ये मटन, चिकन विक्रेत्यांसाठी नगरपंचायतीने स्वतःच्या निधीतून गाळे उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी स्थानिक विक्रेत्यांनी नगरपंचायतीकडे माहे जानेवारी, २०१८ केली आहे, ही वस्तुस्थिती आहे .
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम, २०१६ नुसार कचऱ्याची विल्हेवाट करण्याकरिता यंत्रणा उभारण्याबाबत

**(२१) ११०९०२ (१८-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम, २०१६ नुसार मोठी गृहसंकुले, शाळा, हॉटेल आणि शासकीय व्यवस्थापना त्यांच्याकडे जमा होणा-या कच-यांची विल्हेवाट करण्याकरिता यंत्रणा उभारण्याकरिता देण्यात आलेली मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी संपली तरी ठाणे जिल्हयातील शेकडो सोसायटया आणि हॉटेल, शाळा यांनी यंत्रणा उभारली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०१८) :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम, २०१६ नुसार तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत ठाणे जिल्हयातील नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, मिरा-भाईंदर, वसई-विरार महानगरपालिकांनी त्यांच्या क्षेत्रातील मोठी गृहसंकुले, शाळा, हॉटेल आणि शासकीय व्यवस्थापना त्यांच्याकडे जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता यंत्रणा उभारण्याबाबत नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच त्या अनुषंगाने सदर यंत्रणा उभारण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेमार्फत बजाविण्यात आलेल्या नोटीस मध्ये कच-यांची विल्हेवाट करण्याकरिता यंत्रणा उभारण्यासंदर्भात दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी पर्यंत मुदत देण्यात आली होती. सदर प्रक्रियेकरीता कोणते तंत्रज्ञान व यंत्रणा वापरण्यात यावी या संदर्भात ज्ञान नसल्याने महानगरपालिकेमार्फत मार्गदर्शन मिळण्याबाबत गृहसंकुले, शाळा, हॉटेल आणि

शासकीय व्यवस्थापना यांनी विनंती केली होती. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने २ दिवसाचे प्रदर्शन भरवून त्याबाबत जनजागृती केली. सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात ८८ गृहसंकुलनांनी कचऱ्यावर प्रक्रिया करण्यास सुरूवात केली आहे. उर्वरित गृहसंकुलनामध्ये देखिल सदर यंत्रणा उभारण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लांजा (जि.रत्नगिरी) नगरपंचायत हददीतील १७ प्रभागांमध्ये खड्डे बुजविण्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत**

**(२२) १११३३८ (१९-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लांजा (जि.रत्नगिरी) नगरपंचायत हददीतील शहरामध्ये १७ प्रभागांमध्ये पावसाळयात पडलेले खड्डे बुजविण्यासाठी नेमलेल्या ठेकेदाराकडून अतिशय निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निकृष्ट दर्जाच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
तथापि, अशा आशयाची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे नगरपंचायतीमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) लांजा नगरपंचायत हददीतील शहराच्या १७ प्रभागामध्ये पावसाळ्यामुळे रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्याच्या कामाची प्रक्रीया प्रचलीत नियमानुसार करण्यात आल्याची बाब नगरपरिषदेने त्यांच्या अहवालात नमूद केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेकडून आकारण्यात येणारा मालमत्ता कर हा खूप जास्त असल्याबाबत**

**(२३) १११५७८ (१२-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिकेकडून आकारण्यात येणारा मालमत्ता कर हा खूप जास्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालमत्ता कर जास्त असल्याने मोठ-मोठे मॉल, तसेच उद्योगधंदे करणारे व्यापारी हे व्यवसाय करण्यासाठी येत नसल्याने परिणामी महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना अत्याधुनिक सुविधांचा लाभ न घेता न येणे, रोजगार उपलब्ध न होणे अशा अनेक बाबी निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालमत्ता कर दर हा मुंबई- पुणे महानगरपालिकासारखा आकरणेबाबत शासन विचारधीन आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
• महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व सुधारीत भांडवली मुल्यवर्धीत कर आकारणी पध्दतीनुसार कोल्हापूर शहरातील मिळकतीच्या मालमत्ता कराची आकारणी सद्यस्थितीत करण्यात येते.
(२) हे खरे नाही.
• स्व:वापरातील मिळकतीसाठी भांडवलीमुल्यावर ०.२५ टक्के दराने व कुळवापरातील मिळकतीसाठी भांडवलीमुल्यावरील ०.५० टक्के दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते.
(३) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीत सुसुत्रता आणण्यासाठी आवश्यक प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेअंतर्गत फायर टॅक्स देण्यास व्यापाऱ्यांनी विरोध केला असल्याबाबत**

**(२४) ११२२७२ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महापालिकेअंतर्गत व्यापारी गाळेधारक यांना व्यवसाय परवाना किंवा नूतनीकरण दाखला देताना आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना त्यांच्या व्यवसायाच्या इमारतीमध्ये करणे बंधनकारक करण्यात आले असून वार्षिक साडेसात हजार रुपयांपर्यंतची फी आकारली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आग विरोधी उपकरण बसवून सदरचा फायर टॅक्स देण्यास व्यापाऱ्यांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आग विरोधी उपकरण बसविलेल्या व्यापाऱ्यांचा फायर टॅक्स माफ किंवा रद्द करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८) :** (१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षक उपाययोजना, २००६ नुसार व्यवसायधारकांना व व्यवसाय क्षेत्रात अग्निशमन उपाययोजना करणे बंधनकारक असून दि.१९/०३/२०१८ रोजीच्या महासभेच्या ठरावान्वये कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत

व्यापारी गाळेधारक यांना नवीन परवाना/नुतनीकरण दाखला घेताना अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजना/आग नियंत्रण साधनेच्या अनुषंगाने वार्षीक शुल्क घेण्यात येते.
(२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणाऱ्या फायर टॅक्स शुल्क विषयी सुरुवातीस व्यापाऱ्यांनी किरकोळ विरोध दर्शविला, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदरच्या उपाययोजना करणे बंधनकारक असल्याने त्याप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये नवीन परवाना/ नुतनीकरण करताना व्यवसायधारकांनी सदर शुल्क भरलेले आहे.

---

**मुरबाड (जि.ठाणे) येथील ब्रिटीशकालीन १२५ वर्षांची ईमारतीला लागलेली आग**

**(२५) ११३८५२ (१२-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील ब्रिटीशकालीन १२५ वर्षाच्या जुन्या इमारतीत दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास आग लागल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८) :** (१) मुरबाड येथील हनुमान मंदीरासमोरील एका इमारतीला आग लागल्याने सदर इमारत पुर्णत: जळल्याची घटना घडल्याचे तहसील कार्यालय, मुरबाड यांचेकडील अहवालात नमूद आहे.
(२) पोलिस खाते मुरबाड यांचेकडील चौकशी अहवालानुसार सदरील आग ही इलेक्ट्रीक वायरचे शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याबाबतचे अहवालात नमूद आहे.
या घटनेतील नुकसानग्रस्तांना नैसर्गिक आपत्ती निधीमधुन नुकसान भरपाई देण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट गावांना आवश्यक मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२६) ११४१२५ (०३-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट फुरसुंगीसह इतर ११ गावांमध्ये पाणी, कचरा व्यवस्थापन, पथदिवे, विविध प्रकारचे दाखले आदी समस्या असून या समस्यांकडे पुणे महानगरपालिका सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट गावांना आवश्यक मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१), व (२) • दि.४.१०.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे पुणे महानगरपालिकेत नव्याने फुरूसुंगीसह ११ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे.
• सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या संबंधीत ११ गावांसाठी सदर आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध नसल्याने मोठी विकासकामे हाती घेता आली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.
• तथापि, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी पुणे महानगरपालिकेने नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी वर्गीकरणाव्दारे आवश्यक निधी उपलब्ध केला आहे. त्यामधून या गावातील देखभाल दुरूस्ती, विद्युत देयके अदायगी अशी कामे करण्यात आली आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
• तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक तरतूद करण्यात आली आहे.
• सदर निधीतून रस्ते, पायाभूत सुविधा, घनकचरा व्यवस्थापन, जलशुध्दीकरण यंत्रणा, सांडपाणी व्यवस्थापन विषयक कामे, आरोग्य व इतर अनुषंगीक विकास कामे करण्याचे प्रस्तावित आहे. पथ विभागामार्फत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये समाविष्ट नविन प्रत्येक गावांतील रस्ते विकसनासाठी रक्कम रु. १७३ लक्षची तरतूद उपलब्ध करण्यात आलेली असून टेंडर प्रक्रिया कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) शहरातील चिंचबांध ते कोंढेतडला जोडणा-या पुलाच्या जोडरस्त्याचे काम

**(२७) ११४६१५ (१९-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) शहरातील चिंचबांध ते कोंढेतडला जोडणा-या पुलाच्या जोडरस्त्याचे काम अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार होत नसल्याने सदर काम बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यासाठी नदीपात्रातील बेकायदा वाळू उपसा करून त्याचा वापर पुलाच्या बांधकामासाठी केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८)** : (१) व (२) कंत्राटदारास दिलेल्या राजापूर शहरातील चिंचबांध ते कोंढेतडला जोडणाऱ्या पुलाच्या जोडरस्त्याच्या कामाची नगरपरिषद अभियंता यांच्याकडून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी केली असता, कंत्राटदाराने अंदाजपत्रकात नमूद मुरुम ऐवजी वाळू वापरल्याचे तसेच कामाच्या गुणवत्तेमध्ये त्रुटी आढळल्याने सदरचे काम नगरपरिषदेमार्फत थांबविण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे.

(३) सदर कामाच्या अनुषंगाने नियुक्त आर्किटेक्ट यांचा अहवाल व उप अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, चिपळूण यांचा टेस्ट रिपोर्ट नगरपरिषदेमार्फत घेण्यात आला आहे.

• तसेच सदर कामाचे थर्ड पार्टी ऑडीट करण्याकरीता नगरपरिषदेमार्फत पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

• नगरपरिषद सभेच्या ठरावानुसार कंत्राटदाराकडून कामामध्ये काही तांत्रिक त्रुटी आढळल्यास त्या दुर करण्याचे हमीपत्र घेऊन सदर पुलाच्या जोडरस्त्याचे बांधकाम माहे एप्रिल, २०१८ मध्ये सुरु करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर नगरपरिषदेने विकास कामाच्या निविदा, ई-निविदा काढताना एकाच ठेकेदाराला सर्व कामे दिल्याबाबत**

**(२८) ११६२४२ (१२-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेने विकास कामाच्या निविदा, ई-निविदा काढताना व इतर बाबीच्या मंजुरीसाठी सर्वसाधारण सभा बोलविण्यात येते परंतु एकाच ठेकेदाराला सर्व १० कोटींची कामे दिली असून ठेकेदाराच्या हितासाठी शासनाचे नियम डावलले असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया बेकायदा असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया पुन्हा नव्याने घेतली जाणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०१८)** : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) पालघर नगरपरिषदेमार्फत हाती घेण्यात आलेल्या विकास कामांची प्रक्रीया प्रचलीत नियमानुसार राबविण्यात आल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बंगळुरू-मुंबई बाह्यवळण मार्गावर वारजे ते डुक्कर खिंडीपर्यंत सर्व्हिस रस्त्याचे काम संथ गतीने होत असल्याबाबत**

**(२९) ११६६९३ (२३-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, वारजे, बाह्यवळण मार्गालगत वारजे ते डुक्कर खिंड या सर्व्हिस रस्त्याचे काम गत अनेक वर्षापासून संथ गतीने सुरू असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंगळुरु-मुंबई बाहयवळण मार्गावर सर्व्हिस रस्त्याच्या कामामुळे या रस्त्यावर अपघातांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून अनेक नागरिकांचे बळी गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्ता महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येत असून याबाबत दिनांक २२ मे, २०१८ रोजी जा.क्र.२५८० ने मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१) होय, पुणे वारजे बाहयवळण मार्गालगत वारजे ते डुक्कर खिंडी या राष्ट्रीय महामार्गामधील सर्व्हिस रस्त्याचे काम तसेच त्या लगतच्या पुणे महानगरपालिकेच्या १२ मी.डी.पी. रस्त्याचे काम टप्प्या टप्प्याने सुरु आहे.

(२) बंगळूरु - मुंबई बाहयवळण मार्गावर सर्व्हिस रस्त्या लगत पुणे महानगरपालिकेचा १२ मी. डी.पी. रस्त्याचे काम अंदाजपत्रकात उपलब्ध होणा-या तरतूदीच्या अनुषंगाने टप्प्या टप्प्याने करण्यात आले आहे. याप्रमाणे आर.एम.डी. कॉलेज ते लोढा हॉस्पीटल व हिल व्हयू सोसायटी ते शेल पेट्रोल पंपापर्यंत काम पूर्ण झालेले आहे. या पूर्ण झालेल्या पुणे महानगरपालिकेच्या सर्व्हिस रस्त्यावर अपघात झाल्याची माहिती उपलब्ध नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळवीले आहे.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) वारजे ते डुक्करखिंडीपर्यंत राष्ट्रीय महामार्गालगत व त्यांच्या सर्व्हिस रस्त्याला लागून असलेल्या पुणे महानगरपालिकेचा १२ मी.डी.पी.रस्ता करणेकरीता अंदाजपत्रकात पुरेशी तरतूदी अभावी तसेच मालमत्ता व्यवस्थापन विभागामार्फत रस्त्यासाठी भूसंपादन करुन जागा ताब्यात आल्यानंतर या ठिकाणी पुणे महानगरपालिकेचा १२ मी. डी.पी.रस्ता करण्यात येत आहे.

---

## धुळे महानगरपालिकेमध्ये नवीन कचरा डेपोसाठी जागा उपलब्ध करण्याबाबत

**(३०) ११७१२८ (२३-०७-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिका प्रशासनाकडे कचरा डेपोत कचरा टाकण्यासाठी जागा शिल्लक नसल्याने कचरा डेपोसाठी नवीन जागेचा शोध सुरु केला असुन या जागेसाठी जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा केला जात असुनही अदयाप जागेविषयी सकारात्मक निर्णय झाला नसल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे महानगरपालिका हद्दीत नव्याने दहा गावाचा समावेश झाला असून कचरा डेपोसाठी जागा न मिळाल्याने महानगरपालिकेला आहे त्याच जागेत कच-याची विल्हेवाट लावावी लागत असुन या कच-याचे विघटन करणारा प्रकल्प नसल्याने नागरिकांच्या आरोग्यावरही दुष्परिणाम होत आहे याद्दष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

धुळे महानगरपालिकेने कचरा डेपोसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे जागेची मागणी केलेली नाही.

(२) धुळे महानगरपालिकेमार्फत कचऱ्यापासून गांडूळ खत व कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला असून, सद्यस्थितीत तो कार्यरत आहे.

तसेच, महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापन आराखडा मंजुर झाला असून, त्यातील बायोमायनिंग प्रकल्पास शासनाचे अनुदान देण्यात आले आहे. अस्तित्वात असलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग केल्यानंतर ७० ते ८०% जागा पुन: उपयोगात येणार आहे.

हद्दवाढीनंतर नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या निघणाऱ्या कचऱ्यासाठी सद्याच्या कचरा डेपोमध्ये पुरेशी जागा उपलब्ध आहे. त्यामुळे महानगरपालिकेस सद्या जागेचा प्रश्न उद्भवणार नाही, असे धुळे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) शहरातील नागरीकांनी पाणीपट्टीची देयके वेळोवेळी भरुनही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २५ टक्के पाणी कपात केल्याबाबत

**(३१) ११७२६६ (२८-०७-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण शहरातील (जि.रायगड) नागरीकांनी पाणीपट्टीची देयके वेळोवेळी भरुनही उरण नगरपरिषदेने एमआयडीसीचे रुपये १३ कोटी न दिल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २५ टक्के पाणी कपात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उरण नगरपरिषदेने रुपये १३ कोटी एमआयडीसीला अदा न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उरण शहरातील पाणी टंचाई दुर होण्याच्या दृष्टीने उरण नगरपरिषदेने कोणती पर्यायी उपाययोजना केली आहे काय व किती कालावधीत एमआयडीसीची पाण्याची थकीत बिले देण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०१८) :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उरण शहराकरीता कोणतीही पाणी कपात केलेली नाही.
• नगरपरिषदेकडे रु. ४.६९ कोटी इतक्या रक्कमेच्या पाणी बिलाची मुळ थकबाकी आहे.
• तर, जलमापक नादुरुस्त असल्यामुळे आकारण्यात आलेली अतिरिक्त रक्कम, मंजुर कोट्यापेक्षा जास्त वापरलेल्या पाण्यासाठी आकारण्यात आलेली अतिरिक्त रक्कम व मुदतीत भरणा न केल्यामुळे आकारण्यात आलेले विलंब शुल्क या करीता महामंडळाने रु. ८.१४ कोटी इतकी रक्कम आकारलेली आहे.
• मुळ थकबाकी व अतिरिक्त रक्कम आणि विलंब शुल्क अशी रु. १२.८३ कोटी इतकी थकबाकी नगरपरिषदेकडे आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पाणी बिल, पाणी पुरवठा योजनेवरील आस्थापना खर्च, विद्युत खर्च, देखभाल व दुरुस्ती इत्यादी खर्चाच्या तुलनेत नगरपरिषदेकडे जमा होणाऱ्या पाणी पट्टीचे उत्पन्न फारच कमी आहे. त्यामुळे दरवर्षी अंदाजे रु.७०.०० लाख इतका तोटा नगरपरिषदेस सहन करावा लागतो, त्यामुळे इतर आवश्यक सेवा सुविधांवरील खर्च भागवून टप्प्या टप्प्याने बिले अदा करण्यात येत आहेत, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
(३) सद्यस्थितीत उरण शहरामध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली नाही. तथापि, अशी शक्यता निर्माण झाल्यास सिडको प्राधिकरणाकडून पर्यायी पाणी व्यवस्था करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
• १४ व्या वित्त आयोगांतर्गत नगरपरिषदेस मिळणाऱ्या अनुदानातून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची पाणी बिले अदा करण्यासंदर्भात नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील महात्मा फुले वाडा व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्मारक यांना जोडणारा रस्ता व लगतच्या मिळकतींच्या भूसंपादनाबाबत

**(३२) ११७६०३ (२३-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महात्मा फुले वाडा व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्मारक यांना जोडणारा रस्ता व लगतच्या मिळकतींचे भूसंपादन करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे भूसंपादनापोटी आवश्यक रक्कम जमा करूनही माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पर्यंत सदर भूसंपादन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले यांच्या राज्य संरक्षित स्मारकाच्या नुतनीकरणाचे सन २०१५ मध्ये सुरु झालेले काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी व या स्मारकाच्या विस्तारासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील सावित्रीबाई फुले स्मारकातील शिल्पे व भित्तीचित्रांच्या कामांचे सन २०१४ मध्ये कार्यारंभ आदेश देवूनही माहे मे, २०१८ पर्यंत हे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१) पुणे महानगरपालिकेने विशेष भूसंपादन क्र. १५ यांचेकडे दि. १६/७/१४ अखेर भूसंपादनासाठी रु. १४.२० को. इतकी रक्कम जमा केलेली आहे. तथापि अद्याप भूसंपादन झालेले नसून जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सामाजिक निर्धारण अहवालावर प्रलंबित आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) संबंधित शिल्पकाराकडून आजपर्यंत १२ पुतळे व २५ म्युरल्सचे कास्टींग करण्यात आले आहे. त्यापैकी २ पुतळे व २० म्युरल्स प्रत्यक्ष कामाचे जागेवर आणण्यात आली आहेत. १० पुतळयांचे स्टुडिओमध्ये पॉलिशिंगचे काम सुरु आहे. सदरचे काम सुरु आहे. सदरचे काम कलाकुसरीचे असल्यामुळे कामास वेळ लागत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेतील कचऱ्यातील काही औषधांची पुनर्विक्री होत असल्याबाबत**

**(३३) ११८२६७ (२८-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या यंत्रणेतून ज्या वैद्यकिय कच-याची विल्हेवाट होणे अपेक्षित आहे तो कचरा थेट स्क्रॅप विक्रेत्यांकडे देण्यात येत असून यातील काही औषधांची पुनर्विक्री करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

कोल्हापूर शहरातील वैद्यकीय व्यवसायामधून निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात येत असल्याचे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
• तथापि, माहे एप्रिल, २०१८ मध्ये भंगार विकणाऱ्या व्यक्तीस तपोवन शाळेजवळील कचऱ्यामध्ये सलाईन बॉटल व रिकाम्या सिरींज इ. साहित्य आढळले, हि वस्तुस्थिती आहे.
• परंतु, सदर बाबीची महानगरपालिकेमार्फत तपासणी केली असता यामध्ये कोणत्याही प्रकारचे औषधे व इतर साहित्य निदर्शनास आलेले नाही.
• सदर घटनेची रितसर पोलीस फिर्याद करण्यात आली असून निदर्शनास आलेल्या जैव कचऱ्याची जैव वैद्यकीय प्रकल्पामार्फत विल्हेवाट लावण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यातील पावरलुम उद्योगास एल.बी.टी.ची रक्कम माफ करण्याबाबत**

**(३४) ११९३६० (२३-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यातील पावरलुम उद्योगास ३ वर्षांपासून मंदीचे सावट असल्यामुळे पावरलुमधारक आर्थिक अडचणीत सापडले असल्यामुळे त्यांची एल.बी.टी.ची रक्कम माफ करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. गृहराज्य मंत्री यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) या निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. तसेच शासनाने दि. १ ऑगस्ट, २०१५ पासून रु ५० कोटीपेक्षा कमी

उलाढाल असलेल्या सर्व व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातून सूट दिलेली होती. त्यामुळे सदर निर्णयाचा लाभ मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील पावरलुम व्यवसाईकांना देखील झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) क्षेत्रातील सुमारे ६९ हजार ९२० बांधकामांना संरक्षण देण्यापासून वगळण्यात आल्याबाबत**

**(३५) ११९४५२ (२९-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) क्षेत्रातील सुमारे ६९ हजार ९२० बांधकामांना संरक्षण देण्यापासून वगळण्यात आल्याचे महानगरपालिका प्रशासनाकडून पत्रकाद्वारे दिनांक ०७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्पष्ट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत बांधकामांना अभय देण्याचे शासनाने जाहीर केले असताना कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील बांधकामे वगळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत किती बांधकामे अनधिकृत आहेत व त्यापैकी किती बांधकामे अधिकृत करण्याचे महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१८) :** (१) व (२) • नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रामधील दि.३१.१२.२०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी शासन निर्णय दि. ०७.१०.२०१७ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२क नुसार अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये केलेले नियम प्रसिध्द करणेबाबत अधिसूचना निर्गमित केलेली आहे.
• सदर अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांकडून अर्ज मागविण्याकरीता दि.०६.०४.२०१८ रोजी महानगरपालिकेने दैनिक वृत्तपत्रामध्ये सूचना प्रसिध्द केली.
• सदर सूचनेमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. १०/२००४ मधील मा. उच्च न्यायालय यांचे आदेशाच्या कक्षेमधील ६९,९२० बांधकामांना उक्त तरतूदी लागू नसल्याचे नमूद केले आहे.
• मा. उच्च न्यायालयाने दि. ३१.०१.२००८ रोजीच्या आदेशान्वये सदर जनहित याचिकेमधील बांधकामे मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय नियमित करण्यास प्रतिबंध केलेले आहे.
(३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत १० प्रभागक्षेत्र कार्यालयात मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. १०/२००४ मधील आदेशाप्रमाणे मा. उच्च न्यायालयाचे माजी निवृत्त न्यायाधिश मा. अग्यार यांची समिती नियुक्त केली होती.

• सदर समितीने त्यांच्या अहवालात दि.०१.०८.१९८७ ते दि. २५.०५.२००७ या कालावधीत ६८,८२३ बांधकामे विना परवानगी आहेत असा उल्लेख केला आहे. तथापि सदर बांधकामांना महानगरपालिका अधिनियमानुसार अनधिकृत घोषित करण्याची कारवाई करण्यात आलेली नाही.

• दि. २६.०५.२००७ ते दि. ३०.०६.२०१८ पर्यंत "अनधिकृत बांधकामावरील कारवाईस बाधा न येता" असा शिक्का मारून कर आकारणी केलेली ४५,६२६ बांधकामे, मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झालेली २२९ बांधकामे, प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी कलम ४७८, २६०(२) अन्वये घोषित केलेली ३३८० अनधिकृत बांधकामे अशी एकूण १,१८,०५८ अनधिकृत बांधकामे आहेत.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या सूचनेनुसार प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी १९ प्रस्ताव महानगरपालिकेकडे प्राप्त झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथेरान (जि.रायगड) पर्यटन स्थळी नगरपालिकेने उभारलेले जागतिक दर्जाचे अवकाश निरीक्षण केंद्र बंद पडले असल्याबाबत**

**(३६) १२०२९३ (२९-०७-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) पर्यटन स्थळी नगरपरिषदेने ८० लाख खर्चाची तरतूद करून उभारलेले जागतिक दर्जाचे अवकाश निरीक्षण केंद्र बंद पडले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथेरान नगरपरिषदेने अवकाश केंद्राच्या उभारणीस आलेल्या खर्चाची मोठी रक्कम ठेकेदाराला न दिल्यामुळे तसेच हंगामी कर्मचाऱ्यांना ६ महिन्यांपासून पगार न दिल्यामुळे सदर अवकाश निरीक्षण केंद्र बंद पडले आहे, हे ही आहे काय,

(३) असल्यास, २४०० फुट उंचीवर असलेल्या माथेरान पर्यटन स्थळी अवकाश केंद्र बंद पडले असल्यामुळे अभ्यासू अवकाश निरीक्षकांना अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त अवकाश निरीक्षण केंद्र तातडीने सुरू करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) माथेरान नगरपरिषदेचे अवकाश निरीक्षण केंद्र जून, २०१८ पर्यंत सुरु होते. पावसाळयातील ढगाळ हवामान व धुक्यामुळे दि.१०/०६/२०१८ नंतर दरवर्षीप्रमाणे अवकाश निरीक्षण केंद्र नगरपरिषदेमार्फत बंद ठेवण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) आकाशगंगा प्रकल्प उभारणीचे कामापोटी अदा करावयाची संपुर्ण रु.७६.७० लक्ष इतकी रक्कम संबंधित कंत्राटदारास माहे जुलै, २०१८ अखेर अदा करण्यात आली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.
(३) पावसाळ्यातील ढगाळ हवामान व धुक्यामुळे सदर अवकाश केंद्र मागील वर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा बंद ठेवण्यात आले असल्याचे नगरपरिषदेने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री क्षेत्र पंढरपुर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीपात्र शेवाळमुक्त करण्याबाबत**

**(३७) १२१०४९ (२५-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री क्षेत्र पंढरपुर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीपात्रात शेवाळ व दुर्गंधीयुक्त पाणी असल्यामुळे सर्व भाविक व वारकरी यांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे दिनांक १९ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिक मास असल्यामुळे भाविकांची पंढरपुर येथे गर्दी होत असताना व चंद्रभागा नदीपात्रत स्नान करण्याचा महिमा असल्याने वारकऱ्यांकडून व पंढरपुर येथील स्थानिक रहिवाशांकडून नदीपात्रातील शेवाळाचा बंदोबस्त नगरपालिका प्रशासनाने करावा व उजणी धरणातुन नदीमध्ये पाणी तातडीने सोडण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक नगरपालिका प्रशासन व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) • उजनी धरणातून सोलापूर शहर व भीमानदीवरील अन्य पाणी पुरवठा योजनांसाठी असलेल्या आकस्मिक आरक्षणातून पाणी भीमा नदीत सोडले जाते. या कालावधीतच चंद्रभागा नदीत पाणी वाहते असते. अन्य वेळी पंढरपूरच्या वरील बाजूस नगरपरिषदेकडून देखभाल होणारा पंढरपूर बंधारा, तर खालील बाजूस जलसंपदा विभागाकडून देखभाल होणारा विष्णूपद (गोपाळपूर) बंधारा या दोन बंधाऱ्यामध्ये नदीपात्रात पाणी साठलेले असते. या साठलेल्या पाण्यातच भाविक स्नान करीत असतात.
• चंद्रभागा नदीच्या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर श्राद्धविधीही होत असतात. येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यास नदीपात्रात निर्माल्य, प्रासादिक वस्तु, जुने कपडे टाकण्याचे प्रमाण साहजिकच वाढते. चंद्रभागा वाळवंटाचे (दगडीपूल ते विप्रदत्त घाट) अंदाजित क्षेत्रफळ ८५ हजार चौरस फूट आहे. तेथील नदीपात्रातील निर्माल्य, शिळे अन्न, अत्यंविधी साहित्य इत्यादी उचलून स्वच्छता करण्याचे काम श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्याकडून नगरपरिषदेच्या सहाय्याने केले जाते.

• वाळवंट व त्याजवळील नदीपात्रातील कचरा उचलून ते स्वच्छ ठेवण्याच्या कामासाठी मंदिर समितीने ई-निविदेद्वारे खाजगी कंपनीची नियुक्ती केली असून या कंपनीमार्फत २ शिफ्टमध्ये स्वच्छतेचे काम दिनांक १५ एप्रिल, २०१८ पासून करण्यात येत आहे.
• उजनीतून पाणी सोडून विष्णूपद (गोपाळपूर) बंधाऱ्यात पाण्याचा साठा करण्याबाबत जलसंपदा विभागाकडून धोरणांनुरुप कार्यवाही होत असते. तथापि, दरम्यानच्या कालावधीत साठलेल्या पाण्यातील निर्माल्य, शिळे अन्न, शेवाळ, अंत्यविधी साहित्य इत्यादी काढून चंद्रभागा नदीचे पाणी स्वच्छ ठेवण्याबाबत पंढरपूर नगरपरिषद व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिति यांच्याकडून वेळोवेळी कार्यवाही होत असते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपुर (जि.सोलापुर) येथील पंढरपुर शहरातील सरगम चौक येथे प्रशासनाने रस्त्याची उंची वाढवली असल्यामुळे वाहतुक कोंडी होत असल्याबाबत

**(३८) १२१२२५ (२९-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर (जि.सोलापुर) येथील पंढरपुर शहरातील सरगम चौक येथे प्रशासनाने रस्त्याची उंची वाढवली असल्यामुळे पुलाची उंची कमी झाली नसल्याने दर ठिकाणी एसटी बसेस व इतर मोठी वाहने पुलाखाली अडकत असल्यामुळे वारंवार वाहतुकीची कोंडी होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणामुळे शहरातील नागरिकांना व वारकऱ्यांना वारंवार या रहदारीचा सामना करण्याबरोबर, पावसाळयात या रेल्वे पुलाखाली साचणाऱ्या पाण्याचा सामना करावा लागत असल्यामुळे प्रचंड त्रास होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पुलाची उंची वाढवून पावसाळयात साचणाऱ्या पाण्याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करणेबाबत रेल्वे प्रशासनाला व नगरपालिका प्रशासनाला अनेकदा मागणी करूनही अद्यापही शासनाने कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त पुलाबाबत स्थानिक प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • पंढरपूर शहरातील सरगम थिएटर जवळील रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी रेल्वे विभागामार्फत सन १९९८-९९ साली पुलाचे बांधकाम करणेत आलेले होते. सदर पुलाचे रस्त्याची (Carriage Way) रुंदी दोन्ही बाजूस प्रत्येकी ४ मीटर प्रमाणे एकूण ८ मीटर इतकी आहे. तसेच पुलाची उंची ३.९० मीटर इतकी आहे.

• सदरच्या पुलाचे बांधकाम करताना पुलाखाली पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी आवश्यक व्यवस्था न केल्यामुळे त्यावेळेपासून पावसाळ्याच्या दिवसात पूलाखाली काही प्रमाणात पाणी साचते. त्यामुळे वाहतुकीला अडचण होत आहे. सदर रेल्वे पुलाखाली साठणारे पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये वाहतुकीस अडथळा होणार नाही, अशा पद्धतीने तात्पुरती व्यवस्था म्हणून पावसाच्या पाण्यासाठी २५ ते ३० हजार लिटर क्षमतेची साठवण टाकी बांधलेली आहे. पावसाळ्यात पडणारे पाणी सदरच्या टाकीत जमा होते नंतर ते पाणी इंजिनने उपसा करुन नजीकच्या नाल्यामध्ये सोडले जाते.
• या ठिकाणच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे सर्व प्रकारच्या वाहतूकीस अडथळा येत होता. याकरिता सर्व खड्डे भरुन घेऊन डांबरीकरणाचा एक थर देणेसाठी दिनांक १८ मे, २०१८ अन्वये कामाचा आदेश (Work Order) देण्यात आला असून रस्त्याची उंची वाढणार नाही, याची काळजी घेण्यात आली असून काम करण्यापूर्वी रस्त्याची खोदाई करण्यात आली होती. सदरचे काम माहे जून, २०१८ मध्ये पूर्ण झालेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील अलिबाग समुद्रकिना-यावरील शौचालय पाडण्याचे आदेश पर्यावरण विभागाने दिले असल्याबाबत

**(३९) १२१३८६ (२९-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग समुद्रकिना-यावरील शौचालय पाडण्याचे आदेश पर्यावरण विभागाने दिले असून हे बांधकाम नगरपालिकेनेच केले असल्याची कबुली अलिबाग नगरपालिकेने दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यावरण विभागाच्या आदेशाप्रमाणे नगरपालिकेच्या सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी, ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करून हे बांधकाम तात्काळ पाडण्याची तसेच शासकीय जागेत अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नगरपरिषद बरखास्त करून प्रशासक नेमण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे निवेदनाद्वारे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०१८) :** (१) हे, खरे आहे.
(२) हे, अशंतः खरे आहे.
पर्यावरण कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे नगरपालिकेचे नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी, यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते श्री. संजय सावंत यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांनी पत्राव्दारे केली होती.

सदर बांधकाम हे स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत केले आहे. केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि. १० जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये विविध प्राधिकरणांकडून (रेल्वे, बंदरे, सी.आर.झेड, पर्यावरण इ.) सामुदायिक/ सार्वजनिक शौचालय बांधण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे.

त्यानुसार, पर्यावरण विभागाने रायगड जिल्ह्यातील अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर शौचालय पाडण्याचे दि. २३/३/२०१८ रोजी दिलेले आदेश त्यांच्याच दि. १२/६/२०१८ रोजींच्या पत्रान्वये मागे घेतले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेने धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचे केलेले सर्व्हेक्षण**

**(४०) १२२३३६ (२५-०७-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्व्हेक्षणात नाशिकमधील किती इमारती धोकादायक व अतिधोकादायक असल्याचे आढळून आले आहे,

(२) असल्यास, अतिधोकादायक इमारतींबाबत कोणती निर्णयात्मक उपाययोजना करण्यात आली वा येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) नाशिक महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्व्हेक्षणात ३४१ धोकादायक/मोडकळीस असलेल्या इमारती आढळून आल्या आहेत.

(२) उक्त इमारतींना “धोकादायक इमारती” घोषीत करणेबाबत वृत्तपत्रांमध्ये जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन, नागरीकांना सदरच्या इमारती त्वरीत मोकळ्या करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत आवाहन करण्यात आले आहे.

तसेच, सदर धोकादायक इमारींमधील नागरीकांना सुरक्षित जागेत हलवुन उक्त इमारती रिकाम्या करुन घेण्याबाबत पोलीस विभागास महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तसेच, नगर विकास विभागाच्या दिनांक ५/११/२०१५ च्या शासन परिपत्रकाप्रमाणे, सदर इमारतींची वर्गवारी करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे व परिसरात शहरातील ३०% आयटी पार्क आणि टॉवरचा**
**व्यावसायिक वापर सुरू असल्याबाबत**

**(४१) १२२९४८ (२९-०७-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर आयटी हब म्हणून ओळखले जावे यासाठी सन २०१५ च्या नव्या आयटी धोरणानुसार शासनाच्या वतीने आयटी पार्कसाठी ३ वाढीव एफएसआय (चटई निर्देशांक) व महानगरपालिकेच्या मिळकत करामध्ये सवलत देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे व परिसरात शहरातील ३०% आयटी पार्कमध्ये पँचतारांकित हॉटेल, क्लब, मसाज पार्लर मनोरंजनाकरीता विविध बार इ. करिता व्यावसायिक वापर सुरू असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिका आणि अन्य यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे आयटी पार्क आणि टॉवरचा वापर तारांकित हॉटेल्स, क्लबमध्ये करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई व सवलत रद्द करण्यासाठी शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, आयटीला चालना देण्याचे धोरणात अंमलबजावणीच्या पातळीवर अनेक त्रुटी निर्माण झाल्याने आयटीच्या विस्तारात अडथळे निर्माण होत असल्याचे व सवलतीच्या गैरवापराबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सन २०१५ च्या नव्या आयटी धोरणानुसार आयटी पार्कसाठी ३ इतक्या वाढीव एफएसआय देण्याची तरतुद आहे.तसेच मिळकतकरात सवलत देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले होते हे खरे आहे. मंजूर नकाशा वापराव्यतिरिक्त अन्य वापराबाबत पुणे महापालिकेकडून सर्व्हेक्षण करणेत आले आहे. तथापि आय टी व्यतिरिक्त अन्य वापर सुरु असल्यास मिळकतकरात दिलेली सवलत काढून व्यावसायिक दराने कर आकारणी करण्यात येते. मान्य नकाशा व्यतिरिक्त इमारतीचा वापर आढळून आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व एम.आर.टी.पी.ॲक्ट नुसार कारवाई करण्यात येते
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये स्त्री रोग व प्रसूतितज्ज्ञ नसल्याबाबत

**(४२) १२३३६० (३०-०७-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांकडे प्रसूतीसाठी महिलांचा ओढा असला तरी प्रत्यक्ष नोंदणी झालेल्यांपैकी केवळ ३५ टक्के गर्भवतींचीच प्रसूती करण्याची क्षमता या रुग्णालयांमध्ये असून स्त्री रोग व प्रसूतितज्ज्ञ नसल्याची कारणे सांगून गर्भवतींना ऐनवेळी खासगी रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१) पुणे महानगरपालिकेच्या प्रसुतिगृहांकडे वार्षिक सुमारे पंधरा हजार गरोदर महिला नाव नोंदणी करतात व सुमारे सात हजार प्रसुति पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये होतात.

सध्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग-२ पदावर कार्यरत असणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्यांपैकी सुमारे १८ वैद्यकिय अधिकारी स्त्रीरोग तज्ञ असून त्यांच्या सेवा स्त्रीरोग तज्ञ म्हणूनच घेण्यात येत आहेत त्यामुळे स्त्रीरोग तज्ञ नसल्याची कारणे सांगुन गर्भवतींना ऐनवेळी खाजगी रुग्णालयामध्ये पाठविण्यात येते हे खरे नाही. काही अपवादात्मक परिस्थितीत गुंतागुंत निर्माण झाल्यास व तृतीय स्तरावरील उपचार आवश्यक असल्यास सरकारी रुग्णालयामध्ये संदर्भीत करण्यात येते.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पर्वती, धायरी, आंबेगाव, कोथरुड, बाणेर, बावधन, कोंढवा, कात्रज (पुणे शहर व उपनगर) या भागांमध्ये टेकड्या फोडून घरे उभारण्यात आली असल्याबाबत**

**(४३) १२३३६५ (३०-०७-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व उपनगरांमध्ये अनधिकृतरित्या टेकडया फोडण्याचे काम सुरू असताना संबंधितांवर कारवाई करण्याकडे महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे मार्च, २०१८ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्वती, बिबवेवाडी, धायरी, आंबेगाव, कोथरुड, बाणेर, बावधन, कोंढवा, कात्रज या भागांमध्ये टेकड्या फोडून घरे उभारण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) पर्वती, बिबवेवाडी, धायरी, आंबेगाव, कोथरुड, बाणेर, बावधन, कोंढवा, कात्रज या भागांमध्ये टेकड्या फोडून घरे उभारण्यात आली हे अंशत: खरे असून असे प्रकार आढळल्यास, पुणे महानगर पालिकेकडून खालील कार्यवाही करण्यात येते.

संबंधितांना नोटीसा देण्यात आलेल्या असून त्यानुसार संबंधीतांवर कारवाई करणेत आलेली आहे. तसेच अनधिकृत बांधकामावर कारवाई करुन अनधिकृत बांधकामे पाडण्यात आलेली आहेत. संबंधीतानां महानगरपालिका अधिनियम १९६६ चे कलम ४७८ (१) अन्वये नोटीस देऊन कारवाई करण्यात आली आहे. तसेच हिंगणे खुर्द येथील व्यक्तींना एम.आर.टी.पी.

कलम ५२ (अ) व ५३ (१) अन्वये नोटीसा बजावणेत आलेल्या आहेत तसेच या अनुषंगाने तहसिलदार, हवेली व वरीष्ठ पोलिस निरीक्षक, सनसिटी रोड पोलिस स्टेशन यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविणेत आलेले आहे.बावधन खुर्द येथील अथश्री सोसायटी समोरील टेकडीवर स.नं. ६० येथे सुरु असलेल्या कामास एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ५२ (अ) अन्वये व कलम ५३ (१) अन्वये नोटीस दि. १२/०१/२०१८ रोजी देणेत येवून जागेवरील टेकडीफोडचे काम थांबविण्यात आले आहे.

बावधन खुर्द येथील अथश्री सोसायटी समोरील टेकडीवर स.नं. ६० येथे सुरु असलेल्या कामास एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ वे कलम ५२ (अ) अन्वये संबंधितावर हिंजवडी पोलिस स्टेशन येथे अन्वये एफ.आय.आर. दाखल करणेत आलेला आहे. संबंधितांस पोलिस विभागामार्फत अटक करुन पुढील गुन्हा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विमाननगर परिसरातील (पुणे) महानगरपालिका शाळेच्या आवारात बांधकामासाठी खोदलेल्या खड्डयातील पाण्यात पडून दोन बालकांचा झालेला मृत्यु

**(४४) १२३३७८ (३०-०७-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील विमाननगर परिसरातील महानगरपालिका शाळेच्या आवारात बांधकामासाठी खोदलेल्या खड्डयातील पाण्यात पडून दोन बालकांचा मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराच्या बेजबाबदारपणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) दिनांक २९/४/२०१८ रोजी मातोश्री शाळा, रामनगर येरवडा, पुणे येथील वॉचमेन क्वार्टर सहपार्किंगच्या कामाकरिता खोदण्यात आलेल्या खड्यात पडून दोन मुलांचा मृत्यु झाला हे खरे आहे.

सदर शाळेमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले असून त्यामध्ये लोखंडी गेट बंद असताना गेटखालील मोकळया फटीतून मुले सरपटत जात असल्याचे सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती खबरदारी पुणे मनपाने घेतली असून सदर घटना अपघात स्वरुपाची असल्याचे पुणे महानगरपालिकेने म्हटले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांच्या स्मारकाच्या कामाबाबत**

**(४५) १२३९०२ (३०-०७-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांचे भव्य स्मारक पुणे शहरातील शिवाजीनगर मतदारसंघात मूळा मुठा नदीकाठाजवळील जागेवर करण्याचे पुणे महानगरपालिकेच्या वतीने जाहीर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अकरा ते बारा वर्षांपासून सदर स्मारकाचे काम बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ पासून ग. दि. माडगूळकर यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत असल्याने त्यांचे स्मारक पूर्ण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१) व (२) ग.दि. माडगुळकर यांच्या स्मारकासाठी सन २००८-०९, २००९-१०, २०१०-११ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिकेतर्फे सदर कामासाठी तरतूद करण्यात आली होती. सदर तरतूदीमधून नदीलगत सुमारे ४७५ र. मी लांबीची संरक्षक भिंत बांधण्यात आली असून स्मारक व उद्यानासाठी आवश्यक खाजगी जागा व विविध शासकीय विभागांच्या जागा अद्याप पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेल्या नाहीत. त्यानुषंगाने महानगरपालिकेकडून जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठपुरवा करण्यात येत आहे. असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) वाकडेवाडी, शिवाजीनगर येथील मुळ जागा ताब्यात आली नसल्याने स्थायी समिती, पुणे महानगरपालिका यांचे मार्फत पुणे महानगरपालिका हद्दीतील हडपसर औद्योगिक वसाहत येथील म्युनिसिपल पर्पज करिता ताब्यात असलेल्या जागेवर सदर स्मारक हस्तांतरित करणेबाबत विचाराधीन आहे.

(४) स्मारक संदर्भातील जागा शासन व खाजगी मालकीची असून हस्तांतरित झालेली नाही. तसेच सदर जागा नदी लगत आहे व मान्य सुधारित विकास आराखड्यामध्ये RFD (River Development Front) आरक्षणाखाली असून बहुतांशी भाग हा रेड लाईन व ब्ल्यू लाईन ने बाधित असल्याने जागेवर स्मारकाचे काम सुरु करता आले नाही.

---

**तलासरी नगरपंचायत क्षेत्रातील कचरा रस्त्यावर टाकला जात असल्याबाबत**

**(४६) १२४६९३ (३०-०७-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी नगरपंचायत क्षेत्रातील उचललेला कचरा रस्त्यावर टाकला जात असल्याने पूर्ण रस्त्याची क्षेपणभूमी रस्ता डम्पिंग ग्राउंड होऊन दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे दिनांक २१ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०१८) :** (१) व (२) अशा आशयाच्या तोंडी तक्रारी नगरपंचायत प्रशासनास प्राप्त झाल्या, हे खरे आहे.
• प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नगरपंचायतीमार्फत पहाणी केली असता, रस्त्यावर कोणत्याही प्रकारचा कचरा टाकला नसल्याचे निदर्शनास आले, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
• तलासरी नगरपंचायत ही नव निर्मित असून डंम्पींग ग्राऊंडच्या अनुपलब्धेतेमुळे नगरपंचायत क्षेत्रातील उचलेला कचरा सद्यस्थितीत क्षेत्रापासून दूर असलेल्या जागेवर टाकण्यात येतो.
• कचऱ्याची दुर्गंधी येऊ नये म्हणून नगरपंचायतीमार्फत औषध फवारणी केली जात असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.
• डंम्पींग ग्राऊंडच्या उपलब्धेतेसाठी नगरपंचायतीमार्फत कार्यवाही सुरु असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेच्या विश्रामगृहाची इमारत विनावापर पडून असल्याबाबत**

**(४७) १२४८३९ (३०-०७-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेच्या विश्रामगृहामधून राजापूरचे दिवाणी न्यायालय स्वमालकीच्या जागेत स्थलांतरित झाल्यानंतरही विश्रामगृहाची इमारत विनावापर पडून असल्याचे नुकतेच माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या विश्रामगृह बंद स्थितीत असण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) राजापूर नगरपरिषद विश्रामगृहाच्या इमारतीचा ताबा दिवाणी न्यायालय, राजापूर यांनी जुलै, २०१७ अखेर सोडल्यानंतर विश्रामगृहाच्या इमारतीची सद्यस्थिती लक्षात घेता व इमारतीची डागडुजी अत्यावश्यक असल्याने सदर इमारत सद्या विनावापर ठेवण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) राजापूर नगरपरिषदेची इमारत २० वर्षापुर्वीची असून सद्यस्थितीत सदर इमारतीची दुरुस्ती करणे, इमारतीचे छत पर्जन्यप्रवण बनविणे, विद्युत दुरुस्ती, त्रिसदस्यीय समितीमार्फत

इमारतीच्या भाड्याचे फेरमुल्यांकन इत्यादी कामे करण्याकरीता इमारत सद्या विनावापर ठेवलेली आहे, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) विधानपरिषद निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर विश्रामगृह इमारतीच्या दुरुस्तीचे काम प्राधान्याने करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या परवाना नूतनीकरणाबाबत**

**(४८) १२६३७५ (२९-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील मनुष्यबळ अभावी परवाना नूतनीकरणाच्या प्रक्रियेस विलंब होत असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील २३९ रुग्णालये बंद पडण्याच्या मार्गावर असून त्याचा परिणाम रुग्णालयात उपचार घेणाऱ्या सुमारे ३५०० हजार रुग्णांवर होणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) पुणे महानगरपालिकेमध्ये सन २०१८ ते २०२१ या कालावधीकरिता खाजगी नर्सिंग होम/रुग्णालये यांचे नुतनीकरण करणेकरिता जानेवारी २०१८ अखेर ते आजतागायत एकूण ३५९ प्रकरणे दाखल झाली असून २३९ नर्सिंग होम/रुग्णालय यांना रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट देण्यात आले आहे. उर्वरित प्रकरणात त्रुटी आढळल्याने सदर प्रकरणे प्रलंबीत आहेत. अर्जदारांकडून कागदपत्रांची पूर्तता झाल्यास सदर प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या मिळकत कराच्या धोरणाला नागरिकांचा विरोध असल्याबाबत**

**(४९) १२६३७७ (२९-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या मिळकत करासंदर्भात वेळोवेळी काढण्यात आलेल्या परीपत्राकांमुळे अमंलबजावणी विषयी संदिग्धता निर्माण झाली असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेची परवानगी घेऊन बांधकाम केलेल्या इमारतीचा भोगवटा पत्र न घेता वापर केला जातो व संबंधित बांधकाम व्यवसायिक व विकासक भोगवटा पत्र घेत नाहीत त्यामुळे भोगवटा पत्र न घेतलेल्या मिळकतधारकांना तिप्पट कर आकारणीच्या नोटीसा कर संकलन विभागातर्फे पाठविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) • महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार पूर्वी बांधकाम परवानगी घेतील आहे परंतु भोगवटा पत्र घेतले नाही अशा मिळकतीस तीन पट करआकारणी करण्यात आली आहे हे खरे आहे.
• मुख्य सभा,पुणे महानगरपालिका ठराव क्र. ६३९ दि. ११/२/२०१३ तसेच महापालिका आयुक्त यांचे कार्यालयीन आदेश दिनांक २.०७.२०१५ नुसार वरीलप्रमाणे तीनपट करआकारणी केलेल्या मिळकतींची करआकारणी बांधकाम विभागाचा अभिप्राय घेवून आकारणी दिनांकापासून पूर्वलक्ष पध्दतीने एकपट करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील बहुउद्देशीय नागरी सुविधा केंद्राच्या जागेबाबत

**(५०) १२६३७८ (२९-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात विविध भागात उभारण्यात आलेल्या बहुउद्देशीय नागरी सुविधा केंद्राच्या जागा व सर्व मालमत्ता ताब्यात घेण्याऐवजी महानगरपालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश सुविधा केंद्राचा वापर हा कचरा, राडारोडा, भंगार सामान तसेच दारूच्या बाटल्या टाकण्यासाठी व्यावसायिकांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) • पुणे महानगरपालिकेच्या बहुउद्देशीय नागरी सुविधा केंद्राच्या जागा व सर्व मालमत्ता ही पुणे महानगरपालिकेतील विभागांच्या व इतर शासकीय विभागांच्या प्रकल्पासाठी वापरण्याबाबतची पडताळणी करण्यात येत आहे.
• मे. वंश इंन्फोटेक प्रा.लि. या कंपनी बरोबरचा च्या कामकाजाच्या करार संपुष्टात आला आहे. भविष्यामध्ये सदरच्या बहुउद्देशीय नागरी सुविधा केंद्राच्या जागेमध्ये इतर प्रकल्प राबविता येतील याबाबतची तपासणी सुरु आहे.

• त्याबाबत या जागेमध्ये पुणे मनपाच्या घनकचरा व्यवस्थापना विभागामार्फत “बहुउद्देशीय CSR प्रकल्पा अंतर्गत नागरिकांनी वापरलेल्या प्लास्टिक बाटल्यांचे क्रशिंग युनिट बसविण्याचा प्रकल्पाचा” प्रस्ताव आहे.

• सदर प्रकल्पासाठी त्यांना जागेची आवश्यकता असून त्याकरीता तसेच इतर शासकीय विभागातील प्रकल्पांकरीता सदरची जागा उपलब्ध होणे बाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.